* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

# *रिसोड येथुन चार चोरीच्या मोटारसायकल स्थानिक गुन्हे शाखा वाशिम कडुन जप्त.*

जिल्हा पोलीस अधिक्षक मा. वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता दिलेल्या आदेशानुसार मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी, कर्मचारी यांचे वेगवेगळे पथके तयार केले. दिनांक १६/०६/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखा वाशिम पोलीस उपनिरीक्षक दिनकर गोरे यांच्या पथकाला गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, रिसोड येथील ०३ अल्पवयीन मुलांकडे कागदपत्र नसलेल्या मोटारसायकल असुन त्या गाडया चोरीच्या असण्याची दाट शक्यता आहे. मिळालेली माहिती वरिष्ठांना देवुन पोउपनि दिनकर गोरे व पथक यांना रिसोड येथील माँ गंगा विदयालय येथे गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे तिन मुले मोटारसायकलसह मिळुन आले. तेथे त्यांचे पालकांना बोलावुन पालकासमक्ष विचारपुस केली असता त्यांच्या ताब्यातील मोटारसायकली हया जिंतुर जि. परभणी येथुन चोरी करुन आणल्याची कबुली दिली. तसेच त्यांनी आणखी एक जिंतुर येथुन चोरी केलेली मोटारसायकल ही ग्राम दापुरी येथील रमेश नारायण जाधव याला विकल्याची कबुली दिली. दिलेल्या कबुलीप्रमाणे १) हिरो पॅशन प्रो मोटार सायकल जिचा चेसीस क्रमांक MBLHA10AWCGH32389 व इंजीन क्रमांक HA10ENCGH12803 २) होंडा शाईन मोटार सायकल जिचा चेसीस क्रमांक MEHJC36NME8012216 व इंजीन क्रमांक JC36E83029915 ३) हिरो पॅश प्रो मोटार सायकल जिचा चेसीस क्रमांक ME4JC36CHB8290813 व इंजीन क्रमांक JC36E2445250 ४) हिरोहोंडा पॅशन प्लस मोटार सायकल जिचा चेसीस क्रमांक MBLHA10EL8GD45331 व इंजीन क्रमांक HA10EB8GD54134 अशा वर्णनाच्या एकुण ०४ मोटारसायकली एकुण किंमती १,३०,०००/– रू. च्या मिळुण आल्याने त्या जप्त करून पुढील कारवाई करीता पोलीस स्टेशन जिंतुर येथे कळविण्यात आले आहे.

सदर कामगिरी पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे यांचे मार्गदर्शनात पोउपनि दिनकर गोरे, पोना सुनिल पवार, पोकॉ निलेश इंगळे, संतोष शेणकुडे, चालक श्याम इंगळे, यांच्या पथकाने केली आहे.

SThakre 17/06/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम